जी. रबीनाथन

वि.

कर्नाटक राज्य आणि इतर

३ एप्रिल, १९९५

मा. न्यायमूर्ती के. रामस्वामी आणि मा. न्यायमूर्ती हंसरिया

सेवा अधिनियम

कर्नाटक शासन सेवक (जेष्ठता ) नियम १९५७

नियम ६-अ- जेष्ठता - संरक्षण अधिकारी - 'एन.सी.सी'.मध्ये नेमणूक आणि नंतर राज्य सेवेत संरक्षण दलात आणि 'एन.सी.सी.'मध्ये केलेली सेवा एकत्र मोजून, राज्य सेवेत जेष्ठता क्रम ठरणे - असे धरण्यात आले की, नियम ६-अ चा लाभ मिळण्याकरीता सेवा सातत्य सलग/ अखंड असावी - 'एन.सी.सी.' सेवा संरक्षण विभागाच्या सेवेत अंर्तभूत होते का ? हे ठरविण्याकरीता प्रकरण शासनाकडे पाठवले.

ता.३०.०६.१९६१ ला, अपिलार्थी याने 'इर्मजन्सी कमिशनन्ड अधिकारी' या पदावर नोकरी धरली. ता.१६.०९.१९६७ ला त्याला पदमुक्त करण्यात आले. त्यानंतर ता.३०.१२.१९६७ ला तो 'एन.सी.सी'.त गेला. तेथे तो २१.०६.१९७२ पर्यंत होता. ता.२७.०६.१९७२ ला, कर्नाटक शासनाने त्याची नेमणूक 'प्रोबेशनरी परिविक्षाधीन व्यावसायीक कमर्शिअल अधिकारी' या पदावर केली. त्याने शासनाला विनंती केली की, संरक्षण सेवा आणि 'एन.सी.सी'. या दरम्यान त्याने 'ब्रेक' घेतला होता. तो माफ करावा. शासनाने त्यास १३.१०.१९६३ पासून सेवा जेष्ठतेच्या कारणाकरीता सलगता/अखंडता दिली. त्याने १९६३ पासून सेवा जेष्ठता मागितली. ती त्यास नाकारण्यात आली. म्हणून त्याने राज्य प्रशासकीय न्यायधिकरण यांच्याकडे दाद मागितली.मात्र त्याचा अर्ज फेटाळण्यात आला.

या अपिलाचे कामी कर्नाटक शासन सेवक जेष्ठता नियम १९५७ च्या कलम ६-अ चा लाभ अपिलार्थीला देता येतो का? हा न्यायालया समोर प्रश्न होता. न्यायाधिकाराचा आदेश रद्द करुन या न्यायालयाने अपिल मंजूर केले.

असे धरण्यात आले की, नियम वाचल्यानंतर असे स्पष्ट दिसून येते की, नियम ६-अ - संरक्षण सेवा, अखिल भारतीय सेवा अथवा केंद्र सरकारची नागरी सेवा किंवा, अन्य कोणत्या राज्याची नागरी सेवा यातील राज्य नागरी सेवेतील बरोबरचा वर्ग किंवा श्रेणी ही बाब जेष्ठतेकरता राज्य नागरी सेवेत त्या वर्गाच्या किंवा श्रेणीच्या सेवेसाठी **पहिली नेमणूक आहे असे मानू नये.** म्हणून नियम असे दर्शवितो की, सेवेत <u>सातत्य</u> सलगता हवी.(१३२-ड)

जर, नोकरीत खंड नसता तर, अपिलार्थी याला ता.३०.०६.१९६३ पासून निश्चितच त्याची जेष्ठता ठरण्याचा हक्क मिळाला असता,परंतु, ऑक्टोबर-१३,१९६३ पासून त्यास जेष्ठतेसाठी सलगता देण्यात आली. तथापि,'एन.सी.सी' मधील सेवा संरक्षण दलाच्या सेवेत येते का? या मोठया प्रश्नाचा निर्णय झाला नाही. न्यायाधिकरणाचे म्हणणे असे होते की, हे शासनाने ठरवायला हवे. अश्या परिस्थीतीत, न्यायालय यावर काही घोषित करु शकत नाही.त्यानुसार, प्रकरण शासनाकडे परत पाठवण्यात आले. जर,शासन या निष्कर्षाला पोहोचले की,'एन.सी.सी’सेवा ही संरक्षण सेवेचा एक भाग आहे. तर, ता.३०.०६.१९६३ पासून अपिलार्थी याला सलग सेवेचा लाभ मिळू शकतो. (१३२-इ ते एच.-१३३-अ)

कर्नाटक शासन वि. बी.एस.एन. रेडडी (१९९५) पुरवणी - ३ एस.एस.सी. ६५७ हा केस-लॉ लागू होतो असे धरण्यात आले.

दिवाणी अपिल अधिकारक्षेत्र : दिवाणी अपिल क्रमांक ४४३०-३१/१९९५

कर्नाटक प्रशासकीय न्यायाधिकरण बेंगलोर यांनी ता.२५.०४.१९९४ ला, अर्ज क्रं.१८७५/९० आणि १७१०/९० मध्ये दिलेल्या निकालपत्र आणि आदेश यावरील अपिल

अपिलार्थीतर्फे वकील - राजू रामचंद्रन, जोसेफ पुक्कट आणि आर.ए.पेरुमल .

उत्तरवादी क्रं.१ ते ९ तर्फे वकील- डॉ.आर.बी. मासोडकर आणि के.एल.तनेजा.

न्यायालयाने खालील आदेश केला -

परवानगी दिली आहे.

प्रकरणाच्या गुणदोषाबाबत उभय पक्षांच्या वकीलांची बाजू ऐकली. अपिलार्थी हा (ता.१३.११.१९६९ ला सुधारणा झालेल्या) कर्नाटक शासन सेवक (जेष्ठता)नियम १९५७ च्या नियम ६-अ चा लाभ मिळण्यास पात्र आहे का ?हाच एकमेव विषय निकालासाठी होता.

ता.३०.०६.१९६३ ला, अपिलार्थी याची संरक्षण सेवेत 'इमरजन्सी कमिनशन्ड' अधिकारी या पदी नेमणूक झाली. ता.१६.०९.१९६७ ला, दुपारनंतर त्याला कार्यमुक्त करण्यात आले. त्यानंतर त्याला परत ३०.१२.१९६७ ला,'एन.सी.सी.'मध्ये घेण्यात आले. तेथे तो २१.०६.१९७२ च्या दुपारपर्यंत होता. दरम्यानच्या काळात कर्नाटक राज्य नागरी सेवेस त्याने 'प्रोहिबीटरी टॅक्स ऑफीसर'मध्ये भरती होण्याचा अर्ज दिला. निवड झाल्यानंतर, ता.२७.०६.१९७२ ला, त्याची नेमणूक झाली. या आधारे त्याने १९६३ पासून जेष्ठता क्रमावर आपला हक्क सांगितला. तो नाकारण्यात आला म्हणून त्याने न्यायाधिकरणात अर्ज १८७५/१९९० व ४७२०/१९९० दाखल केला. त्यावेळी न्यायाधिकरणाच्या दोघां सदस्यामध्ये याबाबत मतभेद झाल्याने, प्रकरण उच्च न्यायालयाच्या पूर्णपिठाकडे गेले. तेव्हा मा. सर्वोच्च न्यायालयाच्या कर्नाटक शासन वि.बी.एस.एन.रेड्डी व इतर(१९९५) ३ एस.एस.सी.६५७ च्या आधारे मागणी फेटाळण्यात आली. म्हणून विशेष परवानगीने हे अपिल करण्यात आले आहे.

कर्नाटक शासन सेवक (जेष्ठता) नियम १९५७ नियम ६-अ असा आहे की,

नियम ६-अ -संरक्षण सेवा, अखिल भारतीय सेवा किंवा, केंद्र सरकारची नागरी सेवा अथवा, अन्य कोणत्या राज्याची नागरी सेवा यातील राज्य नागरी सेवेतील बरोबरचा वर्ग किंवा श्रेणी ही बाब जेष्ठतेकरता राज्य नागरी सेवेत त्या वर्गाच्या किंवा दर्जाच्या सेवेसाठी **पहिली नेमणूक आहे असे मानू नये.** बदली झालेल्या अथवा, अश्या पध्दतीने नेमणूक झालेल्या व्यक्तीची पहिली नेमणूक ती व्यक्ती बदली आधी ज्या पदावर होती ती मानावी.

मात्र जर, सदरची बदली अथवा नेमणूक ही त्या अधिकाराच्या विनंतीवरुन झाली असेल तर, त्याची बदली किंवा नियुक्ती करण्यात आली, तेथे त्याची बदली किंवा नियुक्तीच्या तारखेच्या तात्काळ आधी त्या वर्गात किंवा सेवेच्या श्रेणीवर असलेल्या व्यक्तीच्या खाली ज्या वर्गात किंवा सेवेत नियुक्ती केली जाते त्या वर्गाच्या किंवा सेवेच्या श्रेणीच्या, जेष्ठता यादीत त्याला स्थान दिले जाईल.

परंतु,जनहितासाठी बदली झाली असेल तर, त्याची जेष्ठता, तो त्या वर्गात वा श्रेणीत बदली झाल्यानंतर पदावर असेल त्याजागी त्याची पहिली नेमणूक झाली त्या तारखेपासून धरण्यात येईल.

बी.एस.एन.रेड्डी केसमधील स्पष्टीकरण येथे गैरलागू असल्याने वगळण्यात आले आहे.

(वरील निवाडयात) या न्यायालयाने सदरचा मुद्दा खुला ठेवला आहे.

याकामी वरील नियमाचा, एखादा व्यक्ती संरक्षण सेवेत किंवा नियमात नमूद केलेल्या आखिल भारतीय सेवेत नेमणूक झाल्यानंतर, मध्ये त्याच्या सेवेत खंड न पडता, राज्य शासनाच्या सेवेत रुजू झाल्यानंतर त्याचा जेष्ठता क्रम ठरवण्याच्या प्रश्नावर काय परिणाम होतो? हे तपासण्याची

गरज नाही. त्या 'केस'मध्ये असे धरण्यात आले की, सेवेत खंड पडला असल्याने, त्या प्रकरणातील उत्तरवादी नियम ६-अ लागू होत नाही. अश्याप्रकारे, असे दिसून येते की, संरक्षण तसेच राज्य सेवेत सलग नोकरीत असलेल्याच्या जेष्ठता क्रमाचा प्रश्न खुला ठेवण्यात आला होता. त्यामुळे याकामी अपिलार्थी याला तो प्रश्न विचार करण्याकरीता उपलब्ध आहे.

नियम वाचल्यानंतर असे स्पष्ट दिसून येते की, नियम ६-अ -संरक्षण सेवा, अखिल भारतीय सेवा किंवा केंद्र सरकारची नागरी सेवा किंवा अन्य कोणत्या राज्याची नागरी सेवा यातील राज्य नागरी सेवेतील बरोबरचा वर्ग किंवा दर्जा ही बाब जेष्ठतेकरता राज्य नागरी सेवेत त्या वर्गाच्या किंवा दर्जाच्या सेवेसाठी **पहिली नेमणूक आहे असे मानू नये.** म्हणून नियम असे दर्शवितो की, सेवेत सलगता हवी. दुस-या शब्दात सेवा खंडीत झालेली नसावी.

जर सेवेत खंड नसेल तर, अपिलार्थी हा निश्चितच ता.३०.०६.१९६३ पासून जेष्ठता निश्चित होण्यास पात्र आहे. परंतु, प्रश्न असा आहे की, त्याची सेवा सलग होती का ?असे आढळून येते की, त्याने भारत सरकारला ता.१८.१२.१९७२ ला, विनंती केली होती की, संरक्षण विभागातील त्याची सेवा आणि एन.सी.सी.मधील त्याची सेवा यात पडलेला खंड माफ करावा.

ता.२०.११.१९६८ च्या पत्र क्रं.५११०/६८/एन.सी.सी.-पी.आर.इ.एस. (ए) व्हॉ. VIII या पत्रानुसार त्यास सैन्य दलातील आधीच्या सेवेबद्दल ता.१३ ऑक्टोबर १९६३ पासून, जेष्ठता बहाल करण्यात आली होती.

दुस-या शब्दात ऑक्टोबर १३ १९६३ पासून जेष्ठतेकरीता सलगता देण्यात आली होती. पण मोठा प्रश्न हा आहे की,एन.सी.सी.तील सेवेला संरक्षक दलातील सेवा म्हणता येईल काय? याचिकेत

दुरुस्ती करुन अपिलार्थीने रिलिफ मागितला परंतु त्याचा निर्णय झालेला नाही. न्यायाधीकरणाने असे धरले की, सदरचा विषय हा शासनाच्या अखत्यारीतील आहे.

वरील परिस्थीती विचारात घेता अपिलार्थी याने एन.सी.सी. मध्ये दिलेली सेवा संरक्षण सेवेचा भाग आहे असे आम्ही जाहीर करु शकत नाही. जर शासन त्या निष्कर्षाला आले तर, अपिलार्थी हा निश्चितच ता.३०.०६.१९६३ पासून सलग सेवेस पात्र ठरेल.

सबब,अपिल मंजूर केले आहे.न्यायाधीकरणाचा आदेश रद्द केला आहे. नियम ६-अ लागू होण्याकरीता,अपिलार्थी याने एन.एस.सी.मध्ये केलेली सेवा संरक्षण दलातील सेवा धरायची का? हे ठरवण्याकरीता प्रकरण शासनाकडे पाठवले आहे. हा आदेश प्राप्त झाल्यानंतर शासनाने सहा महिन्यात त्याचा निर्णय दयावा असे त्यांना निर्देश देण्यात आले आहे.

खर्चाबाबत आदेश नाही.

अपिल मंजूर केले आहे.

**अस्वीकरण**

या न्यायनिर्णयाच्या मराठी भाषेतील या अनुवादाचा वापर हा पक्षकारास त्याच्या/ तिच्या मातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याही कारणाकरता वापर करता येणार नाही तसेच इंग्रजी भाषेतील न्यायनिर्णय हाच सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन वापराकरिता विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबजावणी करता वैध मानला जाईल.